महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com

म्हाडा MHADA

=================================================================

जावक क्रमांक – ४०७६/६३ दिनांक :- ११ ऑक्टोबर, २०२४

**प्रसिद्धिपत्रक**

# परवडणाऱ्या किंमतीत घरे उपलब्ध होण्याकरिता नागरिकांनी सूचना पाठवाव्यात - श्री. राजेंद्र मिरगणे

मुंबई, दि. ११ ऑक्टोबर, २०२४ :- राज्यातील विविध गृहनिर्माण योजना सक्षमपणे राबविण्याकरिता व परवडणाऱ्या किंमतीत घरे उपलब्ध होण्याकरिता सर्व सहकारी गृहनिर्माण संस्था, वास्तुशास्त्रज्ञ, विकासक व इतर सर्व संबंधित नागरिकांनी आपल्या सूचना गृहनिर्माण विभागाचे सल्लागार यांचे म्हाडा गृहनिर्माण भवनातील कार्यालय येथे पाठविण्याचे आवाहन गृहनिर्माण विभागाचे सल्लागार श्री. राजेंद्र मिरगणे यांनी केले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या गृहनिर्माण विभागाने श्री. राजेंद्र मिरगणे यांची गृहनिर्माण विभागासाठी सल्लागार म्हणून नेमणूक केली आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये विविध गृहनिर्माण योजना सक्षमपणे राबविण्याकरिता सध्या अस्तित्वात असणारी धोरणे, नियमावली यामध्ये सुधारणा, बदल सुचविणे अशी कार्यकक्षा निश्चित करण्यात आली आहे. सहकारी गृहनिर्माण संस्था, वास्तुशास्त्रज्ञ, विकासक व इतर सर्व संबंधिताकडून मागविण्यात आलेल्या सूचनांचा विचार करून गृहनिर्माण विभागास अहवाल सादर करण्यात येईल, असे श्री. मिरगणे यांनी एका पत्रकाद्वारे कळविले आहे.

संबंधितांनी आपल्या सूचना मा. अध्यक्ष, सल्लागार समिती, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय, दालन क्र. ४२६, तिसरा मजला, गृहनिर्माण भवन, म्हाडा, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१ या कार्यालयीन पत्यावर व chairmanadvisorycommittee@gmail.com या ई मेल आयडीवर दिनांक २८ ऑक्टोबर २०२४ पर्यंत पाठवण्यात याव्यात, असे आवाहन गृहनिर्माण विभागाचे सल्लागार श्री. राजेंद्र मिरगणे यांनी केले आहे.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा

---

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial